# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/08/2021 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बुटीबोरी :– पो.स्टे. बुटीबोरी दिनांक 28/03/2018 चे 21.29 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे अप. क्र. 202/2018 कलम 354 (अ), 452 भादवी सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 28/03/2018 चे 17.20 वा. दरम्यान 14 वर्षीय पीडित/फिर्यादी मुलगी हि तिचे घरी एकटी घरी हजर असतांना आरोपी नामे– तुकाराम नारायण गलपलवार, वय 40 वर्ष, रा. शेडगाव गौरी, ता. नारायण गाव जि. नांदेड ह. मु. छोटी बोरी रूईखैरी ता.जि. नागपूर याने फिर्यादीच्या घरात प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 29/03/2018 चे 23.05 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम, पो.स्टे. बुटाबोरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 10/08/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. राजेश आर पठारे, जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (अ) भादंवि. मध्ये 6 महिने साधी कैद व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा, कलम 452 भादंवि मध्ये 6 महिने साधी कैद व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा, तसेच कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये 3 वर्ष साधी कैद व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 वर्षाची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. भवानीप्रसाद मिश्रा, रमेश धामणे, पोहवा सुनिल डोंगरे, अनिल व्यवहारे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर